**वाचले :-** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च 2020
4. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 चे कलम 43

------------------------------0000------------------------------

क्र दंडप्र-01/कावि/2020/51
जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय,
जळगांव. दिनांक 21/03/2020

**आदेश :-**

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत करोना विषाणू संसर्ग बाधित व्यक्ती आढळत असून अनेक प्रवासी भारतात व इतरत्र प्रवास करीत आहेत, यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे आणि सदर संशयित व्यक्तीमुळे आपत्तीजन्य परिस्थिती जळगांव जिल्हयात उद्भवू नये यासाठी पूर्व तयारी करण्याबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी, **डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जळगांव** मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून **"जळगांव जिल्हयातील सर्व हॉटेल्स, धाबे, रिसॉर्ट, फार्म हाऊस, रेस्टॉरंट, खानावळी, लॉजिंग, आईसक्रीम पार्लर, सर्व प्रकारचे शीत पेयांचे गाडे व दुकाने (उदा. लिंबू /सोडा सरबत, बर्फाचे गोळे, आईसकँडी, ऊसाचे रस इ. तत्सम सर्व) तसेच सर्व प्रकारचे खाद्य पदार्थांचे गाडे (उदा. चहा, वडा/भजी पाव, आमलेट, बिर्यानी, चायनीज, पाणी पुरी, इ. तत्सम सर्व), सर्व प्रकारचे सोने-चांदीचे दुकाने, कापड, ऑटोमोबाईल, भांड्याची दुकाने, इलेक्ट्रीकल्स व इलेक्ट्रॉनिक्स, टिंबर, हार्डवेअर, प्लायवुड, झेरॉक्स दुकाने, फोटो स्टूडिओ, लॉटरी सेंटर, मोबाईल रिपेअरींग व विक्री, सलून, ब्युटी पार्लर, फटाके, गॅरेज, स्विट मार्ट्स, व्हिडीओ गेम्स, सायबर कॅफे, व्हिडीओ पार्लर, साहसी खेळांचे ठिकाणे, वॉटर पार्क्स व कला केंद्रे इत्यादी सर्व प्रकारचे करमणुकीची व खेळाची केंद्रे आणि क्लब व तत्सम दुकाने हे दिनांक 23 मार्च, 2020 पासून पुढील आदेश होईपावेतो पूर्णपणे बंद करण्यात येत आहेत."**

**सदरचा आदेश हा खालील बाबतीत लागू होणार नाही.**

1. **जिवनावश्यक वस्तू, किराणा दुकाने, औषधालये, फळे, भाजीपाला, दुध विक्री दुकाने.**
2. **अत्यावश्यक सेवा व सेवेतील व्यक्ती, रुग्णालये, पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, दवाखाने.**
3. **अंत्यविधी** (गर्दी टाळून).
4. **प्रसार माध्यम कार्यालये.**

सदर आदेशाचे उल्लंघन कोणत्याही व्यक्ती/ संस्था/संघटना यांनी केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188 व मुंबई पोलीस अधिनियम, 1951 चे कलम 43 नुसार शिक्षेस पात्र राहील.

अविनाश ढाकणे
**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,**
**जळगांव**

**प्रत :- मा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर**
**प्रत :- सर्व संबंधितांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय अधिकारी सर्व/ तहसिलदार सर्व
5. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जळगांव
6. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगांव
7. जिल्हा शल्य चिकीत्सक जळगांव
8. मुख्याधिकारी सर्व नगरपालिका/नगरपंचायत
9. सहायक कामगार आयुक्त जळगांव /सहायक संचालक, अन्न व औषध प्रशासन विभाग जळगांव
10. जिल्हा माहिती अधिकारी जळगांव यांनी सदर आदेशाची स्थानिक वर्तमानपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.